# अनुक्रमणिका


● अभ्यासार्थींना व्यावहारिक पण महत्त्वाच्या सूचना पृष्ठ १
● प्रास्ताविक, 'श्री. दा. अ.' अभ्यासक्रमाचे स्वरूप पृष्ठ २-५
● श्री. दा. अ. संबंधात प्रश्नोत्तरे पृष्ठ ६
● समास-त्याचा सारांश आणि त्यावरील प्रश्नपत्रिका

| स्वाध्याय क्र. | दशक समासांचा क्रमांक | ओव्या | पृष्ठांक | समासांची नांवे | नियमित प्रवेश योजना महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | द. १ - १ | ३८ | ७-९ | ग्रंथारंभ लक्षण | जानेवारी |
| २ | १२ - १ | २० | ९-१० | विमल लक्षण | फेब्रुवारी |
| ३ | १२ - २ | ३० | ११-१३ | प्रत्ययनिरूपण | मार्च |
| ४ | २ - २ | ४२ | १३-१५ | उत्तम लक्षण | एप्रिल |
| ५ | ११ - ३ | ३० | १५-१८ | शिकवणनिरूपण | मे |
| ६ | ४ - ३ | ३५ | १८-२० | नामस्मरणभक्ती | जून |
| ७ | १२ - ९ | ३० | २०-२२ | यत्नशिकवण | जुलै |
| ८ | १२ - १० | ४३ | २२-२५ | उत्तमपुरूषनिरूपण | ऑगस्ट |
| ९ | १८ - ६ | २२ | २५-२६ | उत्तमपुरूषनिरूपण | सप्टेंबर |
| १० | १९ - १० | ३० | २७-२८ | विवेकलक्षणनिरूपण | सप्टेंबर |
| ११ | १४ - ६ | १३ | २९-३० | चातुर्यलक्षण | ऑक्टोबर |
| १२ | २० - १० | ३७ | ३१-३३ | विमलब्रह्मनिरूपण | नोव्हेंबर |
| | एकूण १२ समास | ३७० ओव्या | | | |

● कठीण शब्दाचे अर्थ व टीपा – पृ. २८ ● दैनंदिन जीवनात दासबोध : स्वयंमूल्यमापन – पृ. २९, ३०
● 'श्री.दा.अ.' अभ्यासार्थींसाठी काही आवश्यक माहिती – मलपृष्ठ आतील बाजू
● श्री.दा.अ. उपक्रमाचे ब्रीद वाक्य ● अभ्यासक्रम आधारभूत समर्थांची बोधवचने – मलपृष्ठ बाहेरील बाजू


## प्रास्ताविक : २५ व्या पुनर्मुद्रणाच्या निमित्ताने

'पत्रद्वारा दासबोध अभ्यास' या उपक्रमाची समाप्ती १-४-२००८ रोजी झाली आहे. आता **'श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)'** हा उपक्रम श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्या पुढाकाराने सुरू ठेवण्यात आला आहे.

सर्व अभ्यासक्रम 'प.दा.अ.'प्रमाणेच 'श्री.दा.अ.' नावाने पुढे चालू ठेवण्यास श्री. द्वा. वा. केळकर यांनी आशीर्वादपूर्वक परवानगी दिली आहे. त्याबद्दल 'श्री.दा.अ. संयोजन समिती' श्री. द्वा. वा. केळकरांची ऋणी आहे. श्री. द्वा. वा. केळकरांनी २४ व्या पुनर्मुद्रणाचे वेळेला लिहिलेले प्रास्ताविकच आम्ही पुन्हा पुढे देत आहोत. हा उपक्रम यशस्वीपणे चालू राहण्यासाठी सहसंयोजकांनी, केंद्रचालकांनी, समीक्षकांनी सहकार्य देण्याचे मान्य केले आहे. त्याबद्दल त्या सर्वांना धन्यवाद. या सर्वांची सेवा श्रीसमर्थचरणी रूजू झाली आहे.

**अध्यक्ष, श्री.दा.अ. पुणे**

## प्रास्ताविक : २४ व्या पुनर्मुद्रणाच्या निमित्ताने : श्री. द्वा. वा. केळकर

श्रीसमर्थ रामदासस्वामी हे आत्मसाक्षात्कारी राष्ट्रसंत होऊन गेले. त्यांनी समाजावर इतके थोर उपकार केले आहेत की, त्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना मन भारावून जाते. त्यांचे पुण्यस्मरण करण्याचा खराखुरा एकच मार्ग – तो म्हणजे व्यक्ती व समाज यांची ऐहिक व पारलौकिक उन्नती ज्यामुळे साधते अशा त्यांच्या दासबोध ग्रंथाचा अभ्यास व प्रसार करणे.

**'आत्माराम दासबोध। माझें स्वरूप असतां सिद्ध।**
**कोणी न करावा हो खेद। भक्तजनीं।**
**नका करूं खटपट। पहा ग्रंथ माझा नीट।**
**तेणें सायुज्याची वाट। ठायी पडे ॥'**

असा आदेशही श्रीसमर्थांनी देहत्यागाचे वेळी दिला आहे. त्याला अनुसरून 'पत्रद्वारा दासबोध अभ्यास' हा

दासबोध प्रसारासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम १९७९ साली सज्जनगड मासिकाच्या माध्यमातून सुरू करण्यात आला. त्याला **प्रचंड प्रतिसाद** मिळाला. 'दासबोध प्रवेश' हे 'प.दा.अ.' उपक्रमाचे पहिले पाठ्यपुस्तक १९८२ मध्ये तयार करण्यात आले. या पुस्तकाचे **२४ वे पुनर्मुद्रण यावर्षी करण्याचा योग आला आहे.** आतापर्यंत एक लाखापेक्षा अधिक दासबोध अभ्यासार्थींनी या पुस्तकाचा अभ्यास केला आहे व त्या सर्वांना दासबोधामध्ये आवड निर्माण झाली आहे.

दासबोध ग्रंथामध्ये एकूण २०० समास आहेत. त्यापैकी केवळ बारा निवडक समासांचा अभ्यास 'प.दा.अ.' उपक्रमाच्या पहिल्या वर्षात करावा लागतो. दर महिन्यात केवळ एका समासाचा अभ्यास करून त्यावर काढण्यात आलेल्या पाच प्रश्नांची उत्तरे अभ्यासार्थींना लिहावयाची असतात. **'भावार्थ दासबोध प्रवेश'** या पुस्तकात ओव्यांचा अर्थ दिलेला आहे. त्यामुळे अर्थ समजून घेऊन उत्तरे लिहिणे मुळीच अवघड नसते. या उत्तरांच्या पत्रिकेला 'स्वाध्याय' असे म्हणतात.

या उपक्रमात भाग घेण्यासाठी प्रवेशार्थीने आपला पहिला स्वाध्याय प्रथम तयार करावा. या पुस्तकातच प्रारंभी प्रवेशपत्रिका छापली आहे ती पूर्णपणे भरावी. ती स्वाध्यायाला जोडावी. आपणास पत्रद्वारा अभ्यास करावयाचा आहे. त्यासाठी फक्त दुहेरी पोस्टखर्चच तेवढा आपणास करावा लागणार आहे. म्हणून पोस्टाची दोन पाकीटे आणावी. एका पाकीटावर स्वत:चा पत्ता लिहावा व त्याची घडी करून स्वाध्यायाला जोडावे. नंतर आपण ज्या जिल्ह्यात राहातो त्या विभागाच्या केंद्रप्रमुखांचे नाव व पत्ता दुसऱ्या पाकीटावर घालावा आणि त्या पाकीटामध्ये १ ला स्वाध्याय, प्रवेशपत्रिका व स्वत:च्या पत्त्याचे पोस्टाचे घडी घातलेले पाकीट घालावे.

केंद्रचालकांकडे आपला स्वाध्याय पोहोचल्यावर त्यांच्याकडून आपणास स्वाध्यायाबद्दल अभिप्राय आणि पुढील स्वाध्याय पाठविण्याचा पत्ता कळविला जातो. आपणास मार्गदर्शक छापील सूचनाही मिळतात म्हणून स्वाध्यायासोबत पोस्टाचे पाकीटच पाठवावयाचे असते. दुसऱ्या स्वाध्यायाचे वेळी मात्र समीक्षणासाठी स्वत:च्या पत्त्याचे अंतर्देशीय पाठवावयाचे असते.

या उपक्रमात भाग घेण्यासाठी कोणतेही शुल्क ठेवण्यात आले नाही. अल्प खर्चामध्ये घरबसल्या हा अभ्यास करता येतो. वर्षानंतर आपणास प्रशस्तिपत्र दिले जाते. असा तीन वर्षाचा हा अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. मानवी जीवनाचे सार्थक करण्याची दिशा देणाऱ्या ग्रंथराज दासबोधासारख्या प्रासादिक व अलौकिक ग्रंथाचा अभ्यास 'प.दा.अ.' या उपक्रमातून आपण अवश्य करावा.

दोन तपे दासबोधाचा प्रसार करणारा 'प.दा.अ.' प्रकल्प आता श्रीसमर्थ सेवामंडळ, सज्जनगड या संस्थेची एक स्वतंत्र उपसमिती म्हणून कार्य करीत आहे. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी सहसंयोजकांनी, केंद्रचालकांनी, समीक्षकांनी सहकार्य केले. त्याचप्रमाणे आमच्या कुटुंबीय मंडळींनी सर्व प्रकारे सहाय्य केले. या सर्वांची सेवा श्रीसमर्थचरणी रूजू झाली आहे.

## ऋणनिर्देश

प्रा. के. वि. बेलसरे यांनी संपादन केलेल्या सार्थ दासबोधातील समासांच्या सारांशाचा अंतर्भाव या पुस्तकामध्ये करण्यास अनुमति दिल्याबद्दल श्रीसमर्थ सेवा मंडळाला आम्ही धन्यवाद देतो. पुस्तकाचे मूल्य वाढू न देता ती अभ्यासार्थींना उपलब्ध व्हावीत यासाठी स्वस्त पुस्तक योजना काढली आहे. त्यासाठी काही उत्स्फूर्त देणग्या मिळतात. या सर्वांचे आभार अशासाठी मानतो, की केवळ त्यांच्या आर्थिक सहाय्यामुळेच अल्प खर्चात अभ्यासार्थींना ती उपलब्ध होतात. श्री समर्थचरणी ही देणगीदारांची सेवा रुजू आहेच. गणेश ऑफसेट प्रा. लि. चे संचालक डॉ. श्री. गिरीश दात्ये आणि त्यांचे सहकारी मुद्रणाचे काम योग्य वेळी करून देतात, त्यांनाही अनौपचारिक धन्यवाद.

पुस्तकाचा प्रसार वाढावा यासाठी समर्थांच्या आशीर्वादाची याचना करीत आहोत. सर्व उपकेंद्रप्रमुख आणि प्रचार करणाऱ्या अभ्यासार्थींना त्यांच्या कामात यश येवो.

## अभ्यासक्रमाचे स्वरूप

दासबोधामध्ये १० समासांचे २० दशक असून एकूण २०० समास आहेत. त्यातील फक्त १२ समासाची निवड 'दासबोध-प्रवेश' या अभ्यासक्रमासाठी करण्यात आली आहे. अभ्यासार्थींना मूळ ग्रंथ वाचण्यात गोडी वाटावी हा प्रमुख उद्देश अभ्यासक्रम आखताना होता. त्या दृष्टीने निवडलेल्या प्रत्येक समासाची विशेषता अभ्यासार्थींनी समजावून घेण्याचा प्रयत्न करावा.

**स्वाध्याय १ :** ग्रंथारंभलक्षण, द. १ स. १. हा समास म्हणजे जणू दासबोध ग्रंथाची श्रीसमर्थांनी स्वत:च लिहिलेली प्रस्तावना आहे. त्यात सांगितलेली ग्रंथाची फलश्रुती अत्यंत मार्मिक आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने मनुष्याच्या अंतरंगात बदल घडतो. त्यामुळे त्याची क्रियाच पालटते. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा यात आहे. २८ व्या ओवीपासून ३७ व्या ओवीपर्यंत फलश्रुती वाचल्यानंतर असे आढळून येते की,

# 'श्री.दा.अ.' संबंधात काही प्रश्नोत्तरे

श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा) या उपक्रमाचा प्रसार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अभ्यासार्थींना काही प्रश्न लोक विचारतात. त्यातील प्रातिनिधीक स्वरूपाचे प्रश्न पुण्याच्या एक अभ्यासार्थी व समीक्षक सौ. लीलाताई आंबेकर यांनी लिहून काढले. त्या प्रश्नांची उत्तरे तत्कालीन 'प.दा.अ.'चे सहसंयोजक डॉ. श्री. द. देशमुख यांनी देण्याचा प्रयत्न केला. त्यांचा अंतर्भाव या पुस्तकात मुद्दाम करीत आहोत.

प्रश्न : दासबोध ग्रंथ आम्ही म्हातारपणी नक्की वाचू. आता तरुणपणात आम्हाला वाचायला का प्रवृत्त करता?

उत्तर : मानवी जीवनाला उत्तम वळण लावून ते सफल करणारा हा ग्रंथ आहे. जीवनाच्या प्रारंभी वाचला व अवलंबिला तर त्याचे हे फल मिळेल. म्हातारपणी जीवन सर्व दृष्टीने निर्बल झाल्यावर त्याचा काय उपयोग? शरीर व मन दुर्बळ झाल्यावर, त्यात उत्सुकता, लवचिकपणा आणि गरज काहीच उरलेली नसताना ग्रंथांची अक्षरे तेथे काय करतील?

प्रश्न : 'श्री.दा.अ.' परीक्षेमुळे मनावर ताण पडतो म्हणून नकोसे वाटते.

उत्तर : पाठ्यपुस्तक उघडे ठेवून उत्तरे द्यायची असतात. त्यामुळे स्मरणशक्तीवर ताण पडण्याचे कारण नाही. प्रश्नपत्रिका बहुतांशी वस्तुनिष्ठ प्रश्नांमुळे सोप्या आहेत. समीक्षण हे सुद्धा मार्क देणारे किंवा प्रतवारी ठरविणारे नसते तर उलट मार्गदर्शक असते. घरबसल्या हा अभ्यास करायचा आहे आणि परीक्षेचा निकालही 'उत्तीर्ण' असाच असल्याने यासारखी दुसरी सोपी परीक्षाच नसेल!

प्रश्न : अध्यात्मिक आनंद, सुख समाधान यासाठी दासबोध आहे तर स्वाध्यायांच्या भानगडीत कशाला अडकविता? आम्ही आमचा वैयक्तिक अभ्यास करूच की?

उत्तर : परीक्षा (किंवा स्वाध्याय-लेखन) हे अभ्यासाला उद्युक्त करण्याचे साधन आहे. परीक्षेसारखी निकड मागे लागल्याशिवाय अभ्यास होत नाही. असामान्यांना परीक्षेची आवश्यकता नाही हे तितकेच खरे. सामान्य माणसांच्या बाबतीत अध्यात्मिक विषयाचा घरच्या घरी अभ्यास होणे प्राय: अशक्य आहे. ज्ञानदेवांसारखे संतसुद्धा 'भाष्यकाराते वाट पुसतु' म्हणून आपल्या अभ्यासाचे साधन उघड करतात. साध्या व्यावहारिक अभ्यासासही शाळा कॉलेजात गेल्याशिवाय भागत नाही. मग सुक्ष्मातिसूक्ष्म परमार्थाचे चिंतन स्वत:च्या बळावर कसे करता येईल?

प्रश्न : सांसारिक जबाबदारी, नोकरी यातून वेळ मिळत नाही. मग या उपक्रमात भाग घ्यायला सवड कशी सापडणार?

उत्तर : आवश्यकता वाटली की त्या कामासाठी सवड काढणे शक्य होते म्हणून एखाद्या गोष्टीची आवश्यकता वाटणे हे महत्त्वाचे आहे. अत्यंत थंड हवेत पांघरुण घेण्याची आवश्यकता कशी पटते? प्रथम पातळसे पांघरुण घेऊन पाहिले व त्याने थंडी कमी झाली की मग चादर, ब्लँकेट या क्रमाने उबदार पांघरुणाची आवश्यकता पटेल. याचप्रमाणे काही साधना केल्याशिवाय व तिची उपयुक्तता पटल्याशिवाय अभ्यासाची आवश्यकता कशी पटेल?

प्रश्न : सामुहिक वाचन चर्चा यांची आवश्यकता बुद्धीच्या वरच्या टप्प्यातील लोकांना वाटत नाही.

उत्तर : सामुहिक वाचनात सहजच नियमबद्धता येते. समुहाला सोडून न राहता आल्याने सक्तीने का होईना पण अभ्यास होतो. उत्तम बुद्धिमत्ता असून वाचन, मनन, चर्चा व साधनच केले नाही तर त्या बुद्धिमत्तेचा काय उपयोग? परमार्थातील सांप्रदायिक रीती या सर्वसामान्यांना डोळ्यापुढे ठेवून आखून दिलेल्या असतात. व्यावहारिकदृष्ट्या आपण कितीही चतुर, बुद्धिवान व लौकिकवान असलो तरी परमार्थात आपण नुसते सामान्यच नव्हे तर हीनावस्थेतसुद्धा असणे शक्य असते. नव्हे बहुतांशी सर्वजण तसेच असतात! (म्हणून ही आपली अवस्था सुद्धा बुद्धिवंतांनी स्वत:च समजून घेऊन सामुहिक वाचन, श्रवण, चर्चा यात भाग घेणे इष्ट आहे.')

प्रश्न : संकटाला तोंड देण्यास दासबोध समर्थ करतो असे म्हणतात पण परिस्थितीच माणसाला शिकवते की! त्यासाठी दासबोधाची आवश्यकता काय?

उत्तर : दासबोध हा केवळ प्रवृत्ती-लक्षण धर्माचा उद्घोष करणारा ग्रंथ आहे अशी समजूत झाल्याने किंवा करून दिल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे. संकटे, आपत्ती आल्यावर त्यांना तोंड कसे द्यावे हे शिकविणे हा शिकवणीचा नकारात्मक भाग आहे. अत्यंत सावधपणे वागून, प्रसंग आणि कालमान ओळखून चातुर्याने वागून संभाव्य आपत्ती, संकटे टाळणे, टाळण्याचे शिकविणे हा दासबोधातील होकारात्मक भाग आहे. तो दासबोध वाचल्याखेरीज कसा ध्यानात येईल? शिवाय निवृत्तीलक्षण सांगणारा दासबोध माणसाला सुखदु:खाचे पलीकडे असलेल्या आनंदरूप आत्मारामाकडे घेऊन जाणारा आहे. माणसाने 'आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे।' किंवा 'संत आनंदाचे स्थळ। संत सुखचि केवळ॥' असा अनुभव घ्यावयाचा असतो, तो दासबोध अगर त्यासारखे ग्रंथ वाचल्याशिवाय कसा मिळेल?

